आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता

१४ जानेवारी २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- भारतीय हवामान विभागाचा दीडशे वर्षांचा प्रवास हा आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा भारतातला प्रवास असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन/ मिशन मौसमचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- मकरसंक्रांत, पोंगल, बिहू इत्यादी सणांचा देशभरात उत्साह

- युजीसी नेट परीक्षा पुढे ढकलण्याचा राष्ट्रीय परीक्षा संस्थेचा निर्णय

**आणि**

- खो-खो विश्वचषक स्पर्धेत भारताची विजयी सलामी

**<><><><><>**

“भारतीय हवामान विभागाचा दीडशे वर्षांचा प्रवास हा आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा भारतातला प्रवास आहे”, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं भारतीय हवामान विभागाच्या दीडशेव्या स्थापना दिवसानिमित्त आयोजित सोहळ्यात ते बोलत होते. दीडशे वर्षांचा हवामानशास्त्र विभागाचा प्रवास हा देशाच्या विज्ञानप्रवासाचं प्रतीक आहे असं ते यावेळी म्हणाले. हवामानशास्त्र विभागाच्या शतकोत्तर सुवर्णजयंतीनिमित्त एका विशेष नाण्याचं अनावरणही त्यांनी केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी मिशन मौसमचा आरंभ केला. मिशन मौसम हा उपक्रम देशाला हवामानबदलाच्या आव्हानाला सामोरं जाण्यासाठी सहाय्यक ठरेल असं त्यांनी यावेळी सांगितलं.

**होल्ड बाईट.....**

देशाला आपत्ती व्यवस्थापनासाठी हवामान विभागाची बहुमोल मदत होत असल्याचं ते म्हणाले. हवामान अंदाज, हवामान व्यवस्थापन आणि हवामानबदलाचे दुष्परिणाम कमी करणे यासंबधीचं  धोरण  असलेल्या IMD विजन-२०४७ चे प्रकाशनही  त्यांनी यावेळी केलं.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या महाराष्ट्र दौऱ्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत उद्या मुंबईत आयएनएस सुरत, आयएनएस निलगिरी या दोन युद्धनौका, तर आयएनएस वाघशीर ही पाणबुडी भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल होतील. याशिवाय, प्रधानमंत्री नवी मुंबईत इस्कॉनच्या श्री श्री राधा मदनमोहनजी मंदिराचं उद्घाटनही करणार आहेत.

<><><><>

‘सबका साथ, सबका विकास आणि सबका विश्वास’, हे भारताचं धोरण जगभरात पोचण्याची आवश्यकता असल्याचं प्रतिपादन परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी आज केलं. ते स्पेनमधल्या भारतीय समुदायाला संबोधित करत होते.  स्पेनच्या दौऱ्यात भारतीय समुदायासमोर बोलताना त्यांनी, भारताची जगभरातील वाढती प्रतिष्ठा आणि ध्रुवीकरण झालेल्या जगात मध्यममार्गी तोडगा काढण्याची भारताची शक्ती अधोरेखित केली.

<><><><>

संरक्षण दलातून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आज सशस्त्र सेना निवृत्त कर्मचारी दिवस साजरा होत आहे. या निमित्त नागपूरच्या वायुुसेनानगर इथं मेंटेनन्स कमांडच्या मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात केंद्रीय

मंत्री नितीन गडकरी यांनी निवृत्त कर्मचाऱ्यांचा गौरव केला. संरक्षण क्षेत्रात स्वयंपूर्ण होणं आवश्यक असून विश्वशांती आणि अहिंसा प्रस्थापित करण्यासाठी संरक्षण दलाच्या तिन्ही दलाची भूमिका महत्वाची असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. कारगिलच्या सोनमर्ग बोगद्याच्या उद्घाटन प्रसंगी उणे ४ अंश सेल्सिअस इतक्या कमी तापमानात आणि कठीण परिस्थितीत सैनिक आपल्या देशाचं रक्षण करतात हे आपण अनुभवलं असल्याचं गडकरी यांनी यावेळी नमूद केलं. सशस्त्र दलातल्या निवृत्त कर्मचाऱ्यांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी कल्याणकारी योजना मदतकक्ष स्थापन करण्यात आला असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**होल्ड बाईट....गडकरी**

**<><><><><>**

श्रोते हो, भारतीय सेना दिवसानिमित्त लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांचा विशेष संदेश आज रात्री ८ वाजता आकाशवाणीवरुन प्रसारित होणार आहे. त्यामुळे रात्री प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्या ८ वाजून १० मिनिटांनी प्रसारित होतील.

**<><><><><>**

मकरसंक्रांतीचा सण आज देशभरात विविध पद्धतींनी साजरा होत आहे. मकर संक्रांतीच्या पुण्य पर्व काळात प्रयागराज इथं महाकुंभमेळ्यात आज अमृत स्नान होत आहे. आज पहाटेपासून विविध साधू आखाड्याच्या संत महंतांनी शाही स्नान करुन या पर्वणीला सुरुवात केली. एकंदर १३ आखड्यांचे प्रमुख संत- महंत आणि त्यांच्या परिवारातल्या साधुंनी त्रिवेणी संगमावर स्नान केलं. सर्वप्रथम स्नान करण्याचा मान महानिर्वाणी पंचायतनी आखाड्याला मिळाला, तर शेवटचं शाही

स्नान पंचायतनी निर्मल आखाड्याने केलं. त्रिवेणीसंगमावर आतापर्यंत १ कोटी ३८ लाख भाविकांनी अमृतस्नान केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

महाराष्ट्रात तीळगूळ घ्या गोड बोला असं आवाहन करत संक्रांती निमित्त शुभेच्छांची देवाण घेवाण होत आहे. घरोघरी ताजे हरभरे, उसाचे करवे, बोरं,आणि सौभाग्यचिन्हांनी सजलेल्या मातीच्या सुगडांचं पूजन आज केलं जातं. ठिकठिकाणी, विशेषतः मुंबईत पतंग उडवण्याचा खेळ रंगला आहे. तमिळनाडूमधे नववर्षदिन पोंगल म्हणून हा सण मोठ्या प्रमाणावर साजरा होतो. तमिळनाडूत तीन दिवस हा उत्सव साजरा होतो.

**<><><><><>**

राष्ट्रीय चाचणी संस्था - एनटीएनं उद्या १५ जानेवारीला नियोजित युजीसी नेट परीक्षा पुढे ढकलली आहे. पोंगल, मकरसंक्रांत आणि इतर सणांच्या पार्श्वभूमीवर ही परीक्षा पुढे ढकलावी, अशी मागणी करण्यात येत होती, त्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचं एनटीएनं निवेदनाद्वारे कळवलं आहे.

**<><><><><>**

मुंबईच्या भारतीय तंत्रज्ञान संस्थेचा ई-मोबिलिटी या विषयातला ऑनलाइन पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम येत्या मार्चपासून सुरू होणार आहे. १८ महिन्यांचा हा अभ्यासक्रम ‘ग्रेट लर्निंग’ या संस्थेच्या सहकार्यानं आयआयटी मुंबईच्या प्राध्यापकांनी तयार केला आहे. या क्षेत्रात काम करणारे, वैज्ञानिक, संशोधक यांना या अभ्यासक्रमाचा लाभ होईल. यात इलेक्ट्रिक वाहनांचं डिझाइन, बॅटरी तंत्रज्ञान यासह इतर विषयांवर लक्ष केंद्रित केलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेत लॉस एंजेलिस इथं लागलेल्या वणव्यामुळे ९२ हजारांहून अधिक जणांना सक्तीचं स्थलांतर करण्याचे आदेश देण्यात आले असून अन्य ८९ हजार जणांना स्थलांतराचा इशारा देण्यात आला आहे. या परिसरात वणव्यामुळे आतापर्यंत २५ जणांचा मृत्यू झाला असून १२ हून अधिक जण बेपत्ता आहेत. या परिसरात वाहणाऱ्या जोरदार वाऱ्यामुळे वणवा पसरत गेल्याने ४० हजार ५०० एकरहून अधिक जमिनीचं नुकसान झालं आहे. दक्षिण कॅलिफोर्नियाच्या काही भागात वीजपुरवठा खंडीत करण्यात आला आहे.

<><><><><>

कतारमधे दोहा इथे हमास आणि इस्रायल यांच्यात युद्धबंदीच्या कराराच्या संदर्भात पुढील वाटाघाटी झाल्याचं पॅलेस्टिनी आणि इस्रायली अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे. मध्यस्थांनी सादर केलेल्या युद्धबंदी कराराच्या मसुद्याला हमासने सकारात्मक प्रतिसाद दिला असून इस्रायलही हा करार व्हावा यासाठी प्रयत्न करत असल्याचं परराष्ट्र मंत्री गिदोन साअर यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

खो-खो विश्वचषक स्पर्धेला काल नवी दिल्ली इथे सुरुवात झाली. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, भारतीय ऑलिंपिक असोसिएशनच्या अध्यक्ष पी. टी. उषा आणि भारतीय खोखो महासंघाचे अध्यक्ष सुधांशु मित्तल यांनी मशाल प्रज्ज्वलित करून स्पर्धेचं औपचारिक उद्घाटन केलं.

या स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात भारतीय संघाने नेपाळवर ४२-३७ असा विजय मिळवला. भारतीय संघाचा आदित्य गणपुले याची सामन्यातील सर्वोत्तम खेळाडू म्हणून निवड करण्यात आली तर शिवा रेड्डी सर्वोत्कृष्ट आक्रमक

खेळाडू ठरला. नेपाळच्या संघाकडून रोहित कुमार या खेळाडूला सर्वोत्तम बचाव करणारा खेळाडू म्हणून गौरवण्यात आलं.

भारताच्या महिला संघाचा पहिला सामना आज नवी दिल्लीतल्या इंदिरा गांधी मैदानावर दक्षिण कोरियासोबत होणार आहे. तर पुरुषांच्या संघाची गाठ आज रात्री सव्वा आठ वाजता ब्राझीलच्या संघाशी पडणार आहे.

**//<><><><><>//**